ऐक्य

सोमवार ०१/०२/२०२१ अंक ९६ ४ ₹ पाने १०

http://

पौष कृष्ण ४ शके १९४२ नक्षत्र उत्तरा शुभ दिवस

# छ. शिवाजी महाविद्यालयात एनसीसी प्रात्यक्षिकांनी प्रजासत्ताक दिन साजरा

कण्हेर, दि. ३१ : छ. शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) विद्यार्थ्यांनी लक्षवेधक प्रात्यक्षिके सादर करून शहिदांना मानवंदना दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य तथा रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले.

प्रारंभी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर यांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले. प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी भारतीयांनी लोकशाही शासन प्रणालीत केलेल्या विकासाचा मागोवा घेतला. सामाजिक समता व धार्मिक सहिष्णुता जोपासण्याचे आवाहन त्यांनी केले. दरम्यान बटालियन सिनिअर अंडर ऑफिसर सौरभ ढाणे यांनी रायफल गार्ड तुकडीचे नेतृत्व केले. सिनिअर अंडर ऑफिसर नेहा कणसे, काजोल पवार यांच्या नेतृत्वाखाली छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी मार्च पास करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी ज्युनिअर अंडर ऑफिसर यश मोरे, सार्जंट प्राजक्ता शिंदे, संदीप मोहिते, गौरव घाडगे, खुशी जाहांगिड यांच्या नेतृत्वाखाली लक्षवेधक असा रायफल ड्रिल डेमो सादर करून उत्कृष्ट सैनिकी शिस्तीचे प्रदर्शन घडविले. यानंतर छ. शिवाजी मिलिटरी ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेणारा गलवान व्याली भारत-चीन सीमेवरील हुबेहूब संघर्ष सादर करून भारतीय सैनिकांनी चिनी सैनिकांच्या घुसखोरीला करारा जवाब दिला याचे रोमहर्षक प्रदर्शन घडविले. या लढाईचे नेतृत्व विजय मोरे व शुभम माने यांनी

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.



**प्रजासत्ताक दिनानिमित्त उपस्थित एनसीसीचे विद्यार्थी व प्रशिक्षक.(भरतराज फोटोज)**

केले. कॅडेट रोहित कांबळे, प्रज्वल निकम, ओंकार लोहार, तेजल जानकर यांच्या नेतृत्वाखाली मराठमोळा मर्दानी खेळ लाठी-काठी, दांडपट्टा यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. श्रुती वेळापुरे व गायत्री भिलारे व त्यांच्या समूहाने देशभक्तिपर गीतांवर नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

या प्रात्यक्षिकांचे मार्गदर्शक आयुष बर्गे, मयुरी जाधव, ॲकॅडमी प्रशिक्षक विक्रमसिंह घाडगे, लेफ्टनंट केशव पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.